# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/०४/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## अवैधरीत्या विदेशी दारुची
## विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १९/०४/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ लोकसभा निवडणुक २०२४ दरम्यान पो.स्टे. काटोल परिसरात पेट्रोलींग करीत असता मुखबीद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, सावरगाव रोड चांडक स्टील ॲड हार्डवेअर व कुशल मटन शॉप यांच्या मध्ये असलेल्या खाली जागेमध्ये एक ईसम मोपेड सुझुकी काळया रंगाची एम. एच– ४०/ यु २४११ गाडीचे डीक्कीमध्ये विदेशी दारू ठेवून विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून सावरगाव रोड चांडक स्टील ॲड हार्डवेअर व कुशल मटन शॉप येथे जावुन नाकाबंदी केली असता मोपेड सुझुकी एम.एच ४०/यु २४११ वर एक इसम गाडीचे डीक्कीमध्ये विदेशी दारू ठेवून विक्री करतांना मिळुन आला. पोलीसांना बघुन घटनास्थळाहुन फरार झाला. मोटरसायकलवर समोर ठेवलेल्या मुद्देमालाची पाहणी केली असता वाहनात अवैधरीत्या विनापरवाना 1) एका निळया रंगाच्या थैली मध्ये विदेशी दारू ऑफिसर चॉईस ब्लु च्या 07 सिलबंद निपा प्रत्येकी 180 एम.एल. क्षमतेचा प्रत्येकी किंमत 150 रू प्रमाणे एकुण किंमत 1,050 रू चा माल 2) मोपेड सुझुकी एम. एच 40 यु 2411 काळया रंगाची किंमत 20,000 रू असा एकुण २१,०५०/– रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरूद्ध कलम कलम ६५ (ई) महा.दा.का गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोनि निशांत मेश्राम, सपोनि शिवाजी नागवे, नापोशि भुषण मदनकर, पोशि गौरव बखाल, सैनिक सुभाष बारई यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर